दैनिक
# मुक्तागिरी
थेट संवाद आपल्याशी...!

रविवार, दि. २४ ऑक्टोबर २०२१

# वाचन हे मुक्त व विविधांगी असायला पाहिजे

## डॉ.उमेश करंबेळकर : मनोरंजनाची साधने जशी उपलब्ध होत गेली,तसे वाचनाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत

सातारा : मराठी साहित्यात विविध साहित्य प्रकारात ग्रंथ उपलब्ध आहेत. साहित्य अकादमी प्राप्त पुस्तके कितीतरी आहेत.कथा,कविता,कादंबरी,वैज्ञानिक लेखन,प्रवास वर्णन असे काहीही असो हे वाचलेपाहिजे.एका विशिष्ट विचारसरणीचे वाचन फक्त करू नये,त्याने अहंगंड निर्माण होतो.केशवसुतांनी म्हल्यास माझ्या कुंपण पडणे अगदी मला न साहे असे जसे म्हटले त्याप्रमाणे वाचन हे मुक्त विविधांगी असायला पाहिजे'' असे मत महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहुपुरी शाखेचे कार्यवाह,पक्षी निरीक्षक व पर्यावरणवादी साहित्यिक डॉ.उमेश करंबेळकर यांनी व्यक्त केले.ते येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये मराठी विभाग,ग्रंथालय विभाग व गुणवत्ता हमी कक्ष यांनी वाचन प्रेरणा दिननिमित्ताने आयोजित केलेल्या 'वाचन व वाचनाभिरुची'या विषयावरील ऑनलाईन राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये बोलत होते.अध्यक्षस्थानी गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार वाघ हे होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



विठ्ठल शिवणकर यांचे मार्गदर्शनाने सदर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी वाचन प्रेरणादिनाचे महत्व सांगताना ते म्हणाले की 'प्रखर बुद्धिमत्ता,अपार कष्ट,आणि प्रचंड आत्मविश्वास हे डॉ.ए.पी.जे.अब्दुलकलाम यांचे वैशिष्ट्य होते.वाचनातून त्यांचे व्यक्तिमत्व घडले.आपल्याकडे महात्मा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशी मोठी वाचनाची परंपरा आहे.खरी वाचन संस्कृती मराठीत ५०-६० च्या दशकात होती.१९४० ते १९८० हा मराठीचा सुवर्णकाळ होता. स्त्री विषयक,बालवाङ्मय,अनेक प्रकारची नियतकालिके याच काळात वाचली गेली. पुढे तंत्रज्ञान विकास होत गेले,दूरदर्शन आले. अनेक वाहिन्या आल्या.स्मार्टफोन आले.फेसबुक,वाटस अप सारखी अनेक समाजमाध्यमे आली. जागतिकीकरणात अनेक मनोरंजनाची साधने जशी उपलब्ध झाली तसे वाचनाकडे दुर्लक्ष होत गेले'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

वाचन संस्कृती घडविण्यासाठी आपण प्रयत्न जाणीवेने करत नाही याबाबत बोलताना ते पुढे म्हणाले की 'पालक चांगले ग्रंथ मुलांना देण्याऐवजी व्हिडीओ गेम्स देऊ लागले.शाळेच्या फी वाढीविरोधात आंदोलने करता तशी शाळेत विद्यार्थ्यांना चांगले ग्रंथ मिळायला पाहिजेत यासाठी आंदोलन का करीत नाहीत ?अनेक ग्रंथालये बंद आहेत.ग्रामीण भागात आसनगाव कुमठे परिसरातील शाळेतले शिक्षक मुलांना 'रविवारच्या' आठवड्यातील कात्रणे गोळा करून त्यांची पुस्तक तयार करून वाचायला देतात.वाचनाची गोडी लावतात.मुलांना वाचनाची आवड आतापर्यंत असते त्यांना विविध प्रकारची पुस्तके डिजीटलाईज वाचनास नसेल तर अभिरुची कशी तयार होणार ?वाचनाचा परिणाम व्यक्तिमत्वावर व लेखनावर होत असतो.आकाशाशी जडले नाते,गगनमध्ये गगन विरळलेअशी शीर्षके का दिली तो समर्पक कशी हे वाचनातून कळले. चितमपल्ली यांनी पक्षी निरीक्षणातून एक लाख शब्द मराठीला दिले.शब्दांच्या उत्पत्ती शोधण्याचा नाद लागला पाहिजे.शब्दांच्या नादात तरंग निर्माण होतात.शब्दबोध करून घेणे म्हणजे ज्ञान प्राप्त करून घेणे असे सांगत त्यांनी पुणाचार न्याय,काकतालीय न्याय,सरड्यानी धाव कुंपणापर्यंत,मकाण्‌ टाळणे,इत्यादी वाक्प्रचारांच्या निर्मितीचे रहस्य उलगडून दाखविले. आणि अशाले चांगले विचार आपल्यापर्यंत येण्यासाठी एक दिवसापुरता वाचन प्रेरणा दिन एवढे मर्यादित न राहता आपले व विद्यार्थ्यांचे वाचन सर्वस्पर्शी व्हावे यासाठी विविध उपक्रम विद्यार्थ्यांची चर्चासत्रे सतत ठेवावीत.ग्रंथालय समृद्ध करावे पण ग्रंथांचे वाचन करा असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ.अनिलकुमार वाघ म्हणाले वाचनाने ज्ञान मिळते. सत्य असत्य काय ते कळते.माणसाला प्रगल्भता येते.आज सोशल मिडीयावर जी माहिती मिळते त्यास ज्ञान म्हणू नये. अपुऱ्या माहितीमुळे सामाजिक प्रश्न मोठे तयार झाले आहेत.आज विद्यार्थी केवळ परीक्षा देण्यासाठी वाचतात. खरे तर ज्ञान संपादन करण्यासाठी वाचावे हे आवर्जून सांगितले जायला पाहिजे' असे मत त्यांनी व्यक्त केले.

या चर्चासत्राचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.सुभाष वाघमारे यांनी केले.वक्त्यांचा परिचय डॉ.कांचन नलावडे यांनी करून दिला.आभार ग्रंथपाल प्रा.एकनाथ झावरे यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.गजानन चव्हाण यांनी केले.या राज्यस्तरीय चर्चासत्रास मॉरीस महाविद्यालय, विदर्भ आबा,शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ सदस्य डॉ.अरुण शिंदे, डॉ. दुष्यंत कटारे, रमेश चव्हाण, प्रसाद कुलकर्णी, डॉ.संजयकुमार सरगडे इत्यादी सर्वविविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, ग्रंथालय सहायक, सेवक, ग्रंथ विक्रेते, सहभागी होते.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा